जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/०६/२०२३
## दि.२९/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २९४/२०२३,भादविक ४५२,१४३,३३९,३२३,५०४,५०६,क्रिमनिल अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३१ वर्षे,रा.वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | १.निहीर चंद्रकांत पटेल,वय-३२ वर्षे,रा.गंगागगन सोसायटी,श्रावस्तीनगर,घोरपडी,पुणे २.किशन पंडीत दळवी,वय-२८ वर्षे,रा.सदर ३.ब्रायन एस अँलेक्झाडर,वय-२६ वर्षे,रा.सदर (अटक) व इतर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा.सेंट पॅट्रीक टाऊन,पुणे-सोलापूर रोड,वानवडी,पुणे येथील हाऊसिंग सोसायटी मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचेशी मागील महिन्या मध्ये यातील नमुद आ.क्र.१ याचेशी झालेल्या वादाचा राग मनात धरून,त्याने त्याचे इतर साथीदारांसह येवुन,गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी यांचे राहते घरात जबरदस्तीने व बेकायदेशीरपणे प्रवेश करून,त्यांना ढकलून देवुन,घरात घुसुन फिर्यादीस मारहाण करून दुखापत केली. तसेच फिर्यादी यांचेसोबत पीजी तत्वावर राहणारे मुलांना,कोई बाहर नही आयेगा,कोई शोर नही करेगा,कोई किसीको फोन नही करेगा अशी धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीचे तोंड दाबून ओरडला तर जीवे मारुन टाकेन अशी धमकी देुवन,त्यांना वाचवण्यासाठी शेजारील लोकांनी दरवाजा वाजविला असता,त्यांनाही याला जर कोणी मदत केली तर सर्वांना बघुन घेवु व तुमचेही असेच हाल करू असे म्हणुन दहशत पसरवुन,फिर्यादीस आज तो तु बच गया,तुझे जानसे मारने आये थे,अगली बार नही बचेगा अशी धमकी देवुन,फिर्यादी यांचेसोबत राहणारे इसमाचा मोबाईल फोन फेकुन देवुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शितोळे ९८५०६१३३८९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२३/२०२३,भादविक ३४१,१२०(ब),५०७,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३७ वर्षे,रा.वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | १.सौरभ सुहास इंगवले,वय-२६ वर्ष रा.सिध्दीविनायक पॅलेस,शास्त्री चौक,भोसरी,पुणे (अटक) व इतर तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०२३ रोजी रात्री २३/०० वा.आपले घर बस स्टॉपचे अलीकडे,नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पिंपरी येथुन वाघोली येथे जात असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करून,आपले घर बस स्टॉपचे अलीकडे फिर्यादी यांचा पाठलाग करुन,त्यांचे गाडीसमोर त्यांची गाडी आडवी लावुन, त्यांचे हातातील लोखंडी हत्यार घेवुन,आज याला संपवुन टाकु असे बोलुन,फिर्यादी यांचेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, व्ही.एम.चंदन ८२७५५२२६९७ / ८३५५९१७६३१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६४९/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मो.व्हे.ॲक्ट कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | हेतव दवे,वय-४४ वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | पी.एम.पी.एम.एल. बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०६/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा.रिलायन्स फ्रेश समोर,साळुंखे विहार रोड,कोंढवा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील बिपीन जसवंतराय दवे,वय-७६ वर्षे,रा.प्रसुन सेनेट,साळुंखे विहार रोड, वानवडी,पुणे हे सकाळी पायी प्रभातफेरी मारण्यासाठी गेले होते. त्यावेळी ते नमुद ठिकाणी रस्ता ओलांडत असताना,यातील नमुद पी.एम.पी.एम.एल. बसवरील चालकाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी बिपीन जसवंतराय दवे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, रासकर ८६८९९४५९९९ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४११/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | अमित नांगरे,वय-२२ वर्षे,रा.मोडक वस्ती,आंबेगांव-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी महिला- १.एक महिला,वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष,केशरी रंगाची साडी व पांढरे रंगाचा स्टोल २.दुसरी महिला,वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे,गुलाबी रंगांची साडी व निळे रंगाचा स्टोल व चश्मा परिधान केलेल्या (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०२३ रोजी दुपारी १३/४५ वा.ते दुपारी १३/५५ वा.चे दरम्यान श्रीगणेश ज्वेलर्स,शॉप नं.७, द्वारका दत्त सदन,मोडक वस्ती,जांभुळवाडी रोड,आंबेगांव-खुर्द,पुणे या दुकानात |
| **तपशिल** | यातील नमुद वर्णनाचे दोन अनोळखी महिलांनी सोने खरेदी करण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे श्रीगणेश ज्वेलर्स दुकानात सोने खरेदी करण्याचे बहाण्याने येवुन,फिर्यादी यांची नजर चुकवुन,दुकानातील सोन्याचे एक जोड कानातील झुमके ३२,०००/- रुपये किंमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, पाटील ९८२३३८५६६५ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १७३/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५० वर्ष,रा.आदर्शनगर,धनकवडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०६/२०२३ रोजी रात्री १९/०० वा.ते १९/१५ वा.चे दरम्यान लक्ष्मी-नारायण चौक बस स्टॉप ते पंचमी चौकाचे दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया लक्ष्मी-नारायण चौक बस स्टॉप ते पंचमी चौकाचे दरम्यान पीएमपी बसने प्रवास करीत असताना,सदर प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात चोरटयाने,फिर्यादी यांचे उजव्या हातातील एक सोन्याची बांगडी २५,०००/-रु किची फिर्यादी यांचे नकळत काढुन चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जगदाळे ८१०८८००८४० / ९६५३६९३६१२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**